SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट्र
Estd. 1962
NAAC 'A' Grade
PHONE: EPABX – 0091-0231-2609000 DBEE Office: 0231-2609068
B.A. Exam. Section: 0231-2609116 Website: www.unishivaji.ac.in
E-mail: ba.section@unishivaji.ac.in

संदर्भ क्र: शिवाजी वि/बी.ए परीक्षा/४२२ दिनांक. १९/०३/२०२१

# अत्यंत महत्वाचे

मा. प्राचार्य,
सर्व सलंग्नित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय:- DEGG, SDC, IIC या विषयाचे गुण संगणक प्रणालीमध्ये भरणेबाबत.

महोदय/महोदया,

आपणास विदीत आहेच कि, सी.बी.सी.एस पद्धतीचा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ पासून सुरु झालेल्या आहे. शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ पासून भाग १, सत्र १ ला **लोकशाही, निवडणूक व सुशासन (Democracy, Elections & Good Governance) (D.E.G.G.)** हा नॉन क्रेडीट विषय सुरु करण्यात आला आहे. संदर्भ (१) शिवाजी वि/अ. मं/३०६९, दिनांक १४/०७/२०१७ व (२) परीक्षा विभाग परीपत्रक दिनांक: ०९/०२/२०१८

तसेच सी.बी.सी.एस अभ्यासक्रमामध्ये नमुद केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ पासून भाग १ सत्र-२ ला **Skill Development Course (SDC)** या विषयाअंतर्गत ५ विषय सुरु करण्यात आले असून त्यापैकी एक विषय घ्यायचा आहे. संदर्भ (३) एस.यु./अ.मं/१२८५२ दिनांक: १०/१२/२०१८, व (४) संदर्भ क्र. शिवाजी वि/बी.ए/परीक्षा/१९५२, दिनांक: १५/०५/२०१९

तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ पासून **Introduction to Indian Constitution (IIC)** हा विषय बी.ए भाग ३, सत्र- ५ ला सुरु करण्यात आला आहे. संदर्भ (५) एस.यु./अ.मं/१४०९, दिनांक: २९/०६/२०२०

उपरोक्त विषय हे सेल्फ स्टडी पद्धतीचे असून ते महाविद्यालय पातळीवर या विषयाची परीक्षा घेण्यात येवून विद्यार्थ्यांच्या PRN नुसार फक्त Pass – Fail - Abs इतकाच निकाल विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेल्या लिंकमध्ये संबंधीत विषयास भरावयाचा आहे.

उपरोक्तपैकी १. DEGG या विषयाची परीक्षा सत्र १ ला फ्रेश/रिपीटर व सत्र २ ला रिपीटर, २. SDC या विषयाची परीक्षा सत्र २ ला फ्रेश/रिपीटर व सत्र १ ला रिपीटर,
३. IIC या विषयाची परीक्षा सत्र ५ ला फ्रेश/रिपीटर व सत्र ६ ला रिपीटर विद्यार्थ्यांसाठी होईल.

उपरोक्त तीन विषय उत्तीर्ण झालेखेरीज विद्यार्थी पदवी प्रमाणपत्र मिळण्यास पात्र असणार नाही, याची नोंद घ्यावी. सदरचा उल्लेख सी.बी.सी.एस अभ्यासक्रमामध्ये देखिल आहे.

DEGG या विषया बाबत सविस्तर परीपत्रक सर्व महाविद्यालयांना दिनांक ०९/०२/२०१८ रोजी पाठविलेले आहे. तरी देखील ब-याच महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांना या विषयाबाबत काहीच कल्पना नसल्याचे दिसून येते.

तसेच **लोकशाही, निवडणूक व सुशासन** हा विषय उत्तीर्ण असल्याबाबतचे प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना दिले आहे. तथापी संगणक प्रणालीत सदर माहिती नसल्यामुळे त्यांच्या गुणतक्त्यामध्ये सदर विषय अनुत्तीर्ण दिसत आहे.

तरी याबाबत आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, उपरोक्त सत्र १,२ व ५ चे तीन विषय व सत्र ४ चा पर्यावरण अभ्यास हा विषय उत्तीर्ण झालेखेरीज विद्यार्थी पदवी प्रमाणपत्रास पात्र ठरु शकत नाही. त्यामुळे सदर बाबतच्या ठळक सूचना तयार करुन त्या सर्व संबंधीत शिक्षक व विद्यार्थी यांचे निदर्शनास आणावे. विद्यार्थी पदवी पूर्ण करतो, पदवी प्रमाणपत्रास अर्ज करतो व तो जमा करतांना त्याच्या निदर्शनास येते कि, आपण उपरोक्त विषय अनुत्तीर्ण आहे. त्यामुळे डिग्री पूर्ण करुन देखिल त्यास प्रमाणपत्र मिळत नाही. त्यामुळे विद्यार्थी सदर विषयास उत्तीर्ण झाला आहे की नाही याची तपासणी करावी व वारंवार या विषयाबाबत विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्याबाबत अवगत करावे.

त्याचबरोबर उपरोक्त चार विषयाची परीक्षा दिली आहे की नाही त्याचे गुण विद्यापीठामध्ये जमा केले आहे की नाही याची खात्री करावी.

तरी उपरोक्त सर्व विषय ज्या अभ्यासक्रमांना लागू आहेत, त्यांनी त्याचे गुण संगणक प्रणालीत भरण्यात यावेत. **(unishivaji.ac.in → online portal → University Dipartments/Colleges → DEGG & Skill Development Course (SDC) Entry......)** या लिंकमधून कॉलेज लॉगीन करुन गुण भरावेत. तसेच ज्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची नेमलिस्ट तयार झालेली आहे त्यांची टर्मवर्क गुण एन्ट्री सुरु झालेली आहे. तरी उपरोक्त गुण एन्ट्री करुन त्याच्या ई मार्कलिस्ट (Hard Copy) त्या त्या संबंधित परीक्षा विभागामध्ये लवकरात लवकर जमा कराव्यात.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/-
प्र-संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबत : १. उपरोक्त संदर्भ क्रमांक १ ते ५
२. गुण प्रणालीमध्ये भरण्याबाबतचे क्रिन शॉट